


दैनिक **अक्षराज** अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : २९७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०८ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# पुण्यातील वाहतूक कोंडी होणार दूर!

## 'एआय' लावणार शहराच्या वाहतुकीला शिस्त

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, पुणे :** 'शहरातील वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी तंत्रज्ञान, तज्ज्ञ सल्ला आणि नागरिकांचा सहभाग अशी त्रिसूत्री स्वीकारली आहे. शहरात लवकरच 'कृत्रिम बुद्धिमत्ते'वर (एआय) आधारित ५०० कॅमेरे बसविण्यात येणार असून, मुंबईच्या धर्तीवर अत्याधुनिक वाहतूक नियंत्रण प्रणाली कार्यान्वित केली जाणार आहे,' अशी माहिती अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील यांनी शनिवारी दिली.



पुणे शहर जिल्हा काँग्रेसच्या पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी यांच्या वतीने शनिवारी 'पुणे ट्रॅफिक परिषदेचे' आयोजन करण्यात आले होते. या वेळी पाटील यांनी शहरातील कोंडी आणि त्यावरील उपाययोजनांची माहिती दिली. शहर वाहतूक उपायुक्त संदीप भाजीभाकरे, पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) सह-व्यवस्थापकीय संचालक ॲलिस पोरे, दीप्ती चवधरी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम, पुणे मेट्रोचे अधिकारी मिहीर कुलकर्णी, हृदयरोगतज्ज्ञ डॉ. राहुल सावंत, पत्रकार मंगेश कोळपकर, काँग्रेसचे नेते गोपाळ तिवारी उपस्थित होते.

'पुण्याची वाहतूक कोंडी ही आता केवळ रस्त्यांची समस्या उरलेली नाही, तर ती नागरिकांच्या आरोग्याशी आणि मानसिक तणावाशी जोडली गेली आहे. 'एआय' कॅमेरे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मानवी हस्तक्षेपाशिवाय थेट आणि स्वयंचलित दंडात्मक कारवाई करतील. वाहतुकीचे स्वयंचलित नियमन करण्यासाठी 'इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम'चा (आयटीएमएस) प्रकल्प वाहतूक शाखेने तयार केला आहे. 'आयटीएमएस'चा अहवाल मंजुरीसाठी सरकारकडे पाठवण्यात आला आहे. आगामी काळात उभे राहणारे १०० किलोमीटरचे मेट्रोचे जाळे आणि पोलिसांची आधुनिक यंत्रणा यामुळे वाहतुकीचा प्रश्न नक्कीच सुटेल,' असा विश्वासही पाटील यांनी व्यक्त केला.

'पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी मेट्रोचे जाळे विस्तारत आहे. मेट्रो स्थानकाजवळ दुचाकीसाठी वाहनतळ उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेशी चर्चा करणार आहोत. शहरात पुन्हा लवकरच 'बस डे' साजरा करण्यात येणार आहे,' असे मिहीर कुलकर्णी यांनी सांगितले.

अर्चना शहा यांनी सूत्रसंचालन केले. अविनाश बागवे यांनी आभार मानले.

# भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्तात जिंतूर प्रशासन अपयशी; तीन वर्षांच्या चिमुकलीवर हल्ला, नागरिकांमध्ये संताप

**अक्षराज : रहीम कोक्कर**



**दि.०७, जिंतूर :** जिंतूर शहरात गेल्या वर्षभरापासून भटक्या कुत्र्यांचा प्रश्न गंभीर बनला असून प्रशासनाला यावर प्रभावी उपाययोजना करण्यात अपयश आल्याचे चित्र दिसत आहे. शहरातील विविध भागांमध्ये भटके कुत्रे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य नागरिकांवर वारंवार हल्ले करत असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.आज बलसा रोड परिसरात एका तीन वर्षांच्या चिमुकलीवर भटक्या कुत्र्याने अचानक हल्ला करून तिला चावा घेतल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून प्रशासनाच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शहरातील अनेक भागांत भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शाळेत जाणारी मुले, सकाळी फिरण्यासाठी बाहेर पडणारे नागरिक तसेच दुचाकीस्वार यांना कुत्र्यांच्या टोळक्यांचा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

विशेष म्हणजे, गेल्या एका वर्षात भटक्या कुत्र्यांच्या हल्लूयांच्या अनेक घटना घडूनही कुत्र्यांचे निर्बिजीकरण, लसीकरण किंवा त्यांचे स्थलांतर यासारख्या उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या गेल्या नसल्याची चर्चा शहरात सुरू आहे.नागरिकांनी प्रशासनाने तातडीने विशेष मोहीम राबवून भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे.लहान मुलांच्या जीवाशी खेळ सुरू असताना प्रशासन मात्र झोपेत आहे का? असा सवाल संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# घरगुती सिलिंडर पुन्हा २१ रुपयांनी महागला!

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.०७, मुंबई :** महागाईच्या झळा सोसणाऱ्या सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरावर पुन्हा घाव. घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात २९ रुपयांनी वाढ झाल्याने गोरगरिबांच्या खिशाला मोठी कात्री बसली आहे.

एकीकडे कष्टकरी, हमाल, शेतमजूर यांचे दैनंदिन उत्पन्न जागेवरच थांबले आहे. दुसरीकडे गॅस, डाळ, तेल या जीवनावश्यक वस्तूंचे दर मात्र महिन्याला वाढताहेत. हाताला काम नाही आणि ताटात भाकरीला गॅस नाही अशी अवस्था आता अनेक घरांची झाली आहे.

**ज्येष्ठ नागरिकांवर दुहेरी अन्याय**

सगळ्यात मोठा फटका ज्येष्ठ नागरिकांना बसतोय. ठराविक पेन्शन, अंगात व्याधी आणि अंगावर महागाई. औषधं घ्यावी की गॅस रिफिल करावा, असा प्रश्न त्यांच्यासम ोर उभा राहतोय. आम्ही देश घडवला, पण म्हातारपणी चुलीसाठीही झगडावं लागतंय अशी खंत अनेक आजी-आजोबा व्यक्त करताहेत.

**सरकारच्या धोरणावर प्रश्नचिन्ह**

गोरगरिबांवर होणारा हा अन्याय थांबणार कधी? सरकार मोठमोठ्या योजनांचा आणि विकासाच्या आकड्यांचा डंका पिटतं, पण तळागाळातील माणसापर्यंत दिलासा पोहोचतोय का? उज्वला योजनेचा लाभ घेऊनही रिफिल करायला पैसे नसतील तर त्या योजनेचा उपयोग काय? फक्त घोषणा करून गोरगरिबांची भूक भागत नाही.

गोरगरिबांच्या ताटातली भाकरी वाचवायची असेल तर सरकारने तातडीने दरवाढ मागे घ्यावी आणि किमान वेतनाची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी संतप्त मागणी आता जोर धरू लागली आहे.

# उसने पैसे ठरले मृत्यूचे कारण : पंढरपूर तालुका पोलिसांनी ४८ तासांत पकडले खुनी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०७, पंढरपूर :** हरिपाठासाठी गेलेल्या भारत पांडुरंग माने यांचा अंधारात निर्घृण खून करून पुरावा नष्ट करणाऱ्या प्रियकर-प्रेयसीच्या मुसक्या पंढरपूर तालुका पोलिसांनी ४८ तासांत आवळल्या आहेत. रमेश धोंडीराम मोटे, वय ४५, रा. नरखेड व ललिता दत्तात्रय सोळगे, वय ४३, रा. गणेशवाडी, ता. मंगळवेढा अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. आधुनिक तंत्रज्ञान, सीसीटीव्ही फ ुटेज व शास्त्रोक्त तपासाच्या आधारे पोलिसांनी अज्ञात खुनाचा हा गुन्हा उघडकीस आणला.






**काय आहे प्रकरण?**

दि. ०२/०६/२०२६ रोजी दुपारी १४.३३ वाजता पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४२६/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३(१) प्रमाणे अज्ञात व्यक्तीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल झाला होता. फिर्यादीचे वडील भारत पांडुरंग म ाने यांना अज्ञात कारणावरून अज्ञात हत्याराने डोक्यात मारून जीवे ठार मारल्याचा मजकूर होता.

**'हरिपाठ'चा रचला प्लॅन**

तपासात धक्कादायक बाबी समोर आल्या. मयत भारत माने हे कीर्तन व हरिपाठासाठी ज्या मंदिरात जात होते, त्या मंदिरांची माहिती आरोपी रमेश मोटे याने आधीच काढली होती. दि. ३१ मे रोजी माने हे नारायण चिंचोली येथील मंदिरात हरिपाठासाठी जाणार व तो रस्ता निर्मनुष्य, अंधाराचा असल्याची खात्री रमेशने केली. त्याने ललिता सोळगे हिला आणवली चौकातून मोटर सायकलवर घेऊन दोघे हरिपाठाला गेले.

**अंधारात पाठलाग, शेतात नेवून हत्या**

हरिपाठ संपताच ललिता सोळगे व भारत माने एका मोटरसायकलवरून रोपळेकडे निघाले. रमेश मोठेने त्यांचा पाठलाग केला. रोपळे येथील एका शेतात थांबल्यानंतर रमेश मोठे व ललिता सोळगे यांनी हत्याराने माने यांच्या डोक्यात, गुप्तांगावर गंभीर वार करून त्यांची हत्या केली. पुरावे नष्ट करून दोघे पसार झाले. ललिता सोळगे व माने यांचा ३१ मे रोजी लोकांसमोर संपर्क होऊ दिला नाही, असा बनाव करण्यात आला.

**सीसीटीव्ही व तांत्रिक तपास ठरला निर्णायक**

सहा. पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली तीन टीम तयार करून पोलिसांनी मोहोळ, पेनुर, टेंभुर्णी, तिसगाव टोल नाका तसेच नारायण चिंचोली, तुंगत, रोपळे गावातील शेकडो सीसीटीव्ही फुटेज तपासले. CDR, SDR चे विश्लेषण केले. त्यातून ३१ तारखेला रमेश मोठे हा ललिता सोळगे सोबत दिसल्याचे निष्पन्न झाले. रमेश मोटेची हिस्टरी तपासली असता त्याने यापूर्वी नरखेड येथे एका महिलेची हत्या करून प्रेत शेतात पुरल्याचा गुन्हा दाखल होता. त्यामुळे संशय बळावला. पोलिसांनी सापळा रचून रमेशला ताब्यात घेतले. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली, पण सीसीटीव्ही पुरावे दाखवताच त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

**उसन्या पैशाच्या वादातून खून**

ललिता सोळगे हिने भारत माने यांच्याकडून वेळोवेळी उसनवारीने पैसे घेतले होते. त्याच वादातून व इतर कारणावरून ३१ मे रोजी दोघांनी प्लॅन करून माने यांना रोपळे येथील शेतात नेवून जीवे ठार मारल्याचे आरोपींनी कबूल केले. दि. ५ जून २०२६ रोजी दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली.

या पथकाने केली धडाकेबाज कारवाई

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, सहा. पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर, पोउनि भारत भोसले, विक्रम वडणे, पोहेकॉ साजन भोसले, दीपक भोसले, सुहास देशमुख, गोंगाने, इरफान शेख, सफौ जनार्दन करे, पोहेकॉ मंगेश रोकडे, स्वप्नील वडदेकर, पोना विजयकुमार आवटी, हसन नदाफ, चालक महेश गोडसे, रामभाऊ चाटे, मपोहेकॉ सुवर्णा कदम, सायबर सेलचे रतन जाधव, मपोअं ननावरे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

# रॉंग साईडने एसटी बस घालून वाहतूक कोंडीत भर

**अक्षराज : प्रमोद डफळ**




**दि.०७, राहुरी :** नगर-मनमाड महामार्गावरील गुहा परिसरात एका एसटी बस चालकाने वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवत बस रॉंग साईडने चालविल्याने काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली. या प्रकारामुळे इतर वाहनचालकांमध्ये संभ्रम निर्माण होऊन अपघाताचा धोका वाढला होता. याप्रकरणी राहुरी पोलिसांनी संबंधित चालकाविरुद्ध कारवाई केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गणेश काशीनाथ कोळी (रा. शिंदखेडा डेपो, जि. धुळे) हा चालक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस चालवत असताना नगर-मनमाड महामार्गावरील आडवे परिसरात चुकीच्या दिशेने वाहन घेऊन गेला. त्यामुळे सम ोरून येणाऱ्या वाहनांना अडचणींचा सामना करावा लागला तसेच काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली. स्थानिक नागरिक व वाहनचालकांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. एसटी महामंडळाच्या चालकांकडून वाहतुकीच्या नियमांचे पालन व्हावे यासाठी वारंवार सूचना व पत्रव्यवहार करण्यात येत असतानाही काही चालकांकडून निष्काळजीपणा होत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, एसटीसारखे सार्वजनिक वाहतूक करणारे वाहन रॉंग साईडने जात असल्याचे पाहून इतर वाहनचालकांमध्येही गैरसमज निर्माण होण्याची शक्यता असल्याने अशा प्रकारांना आळा घालण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, या प्रकरणाची दखल घेत राहुरी पोलिसांनी संबंधित बस चालकाविरुद्ध मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई केली असून वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे.

# बसस्थानक परिसरात चंद्रपुरात २०० मीटर 'नो पार्किंग झोन', १५ जूनपर्यंत धडक कारवाई

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नावर अवैध प्रवासी वाहतुकीचा वाढता परिणाम लक्षात घेता चंद्रपुर विभागात मोठी कारवाई मोहीम हाती घेण्यात आली आहे. बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात 'नो पार्किंग झोन' लागू करत आजपासून १५ जूनपर्यंत धडक कारवाई केली जाणार आहे. अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एसटीच्या महसुलात मोठी घट होत असल्याचे वारंवार निदर्शनास आल्यानंतर ही मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. या पार्श्वभूमीवर राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विशेष बैठकीत याबाबत गंभीर दखल घेतली होती. त्यानंतर मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी तथा पोलिस उपमहानिरीक्षक डॉ. प्रियंका नारनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत बसस्थानक परिसरात अनधिकृतपणे प्रवासी उचलणाऱ्या वाहनांवर लक्ष ठेवले जाणार असून, नियमभंग करणाऱ्यांवर स्थानिक पोलिसांच्या मदतीने कडक कारवाई केली जाणार आहे. यासाठी सर्व पोलिस आयुक्त आणि अधीक्षकांना सहकार्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. चंद्रपुर विभागात सुरक्षा व दक्षता अधिकारी किरण नागमोते यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई राबवली जाणार आहे. विभागातील अधिकारी, पर्यवेक्षक, आगार प्रशासन आणि स्थानिक पोलिस यांच्या समन्वयातून अवैध वाहतुकीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. चंद्रपुर मध्यवर्ती बसस्थानकासह राजुरा, मूल, भद्रावती, वरोरा, चिमूर, सावली आणि बल्लारपूर येथील बसस्थानक परिसरात ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. बसस्थानकाबाहेर अनधिकृत प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे एसटीच्या प्रवासी संख्येत घट होत असल्याने या कारवाईला विशेष महत्त्व दिले जात आहे.

एसटीच्या उत्पन्नावर अवैध प्रवासी वाहतुकीचा गंभीर परिणाम होत आहे. त्यामुळे बसस्थानक परिसरात २०० मीटर 'नो पार्किंग झोन'ची काटेकोर अंमलबजावणी करून अनधिकृत वाहतुकीवर आळा घालण्याचा आमचा प्रयत्न आहे. प्रवाशांनी अधिकृत एसटी सेवेचा वापर करावा, ही नम्र विनंती आहे. तसेच स्थानिक नागरिक, वाहनधारक आणि चालकांनी प्रशासनाला सहकार्य करावे. १५ जूनपर्यंत सुरू असलेल्या या विशेष मोहिमेमुळे निश्चितच एसटीच्या उत्पन्नात वाढ होईल आणि प्रवाशांना अधिक सुरक्षित व विश्वासार्ह सेवा मिळेल, असे अंकुश खाडिलकर आगार व्यवस्थापक चंद्रपूर आगार यांनी सांगितले.

**अधिकृत सेवा वापरण्याचे आवाहन :** एसटीचे उत्पन्न वाढविणे आणि प्रवाशांना सुरक्षित, अधिकृत सेवा उपलब्ध करून देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. स्थानिक पोलिसांच्या सहकार्याने अवैध प्रवासी वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण आणले जाईल.

**– श्रीमती किरण नागमोते**
**सुरक्षा व दक्षता अधिकारी चंद्रपूर विभाग**




## शिवानी जिवंत होते तेव्हा...

बुलढाणा जिल्ह्याच्या जळगाव जामोद परिसरातील राजुरा धरण भागात एका महिलेचा मृतदेह आढळतो. तिचे मुंडके छाटलेले असते. ते काही अंतर दूरवर जाऊन पडलेले असते आणि तिचा देह जाळून टाकलेला असतो. या हत्याकांडाने संपूर्ण जिल्हा हादरतो. पोलिस यंत्रणेची धावपळ होते. मृतदेह नेमका कुणाचा हे कळल्याखेरीज खुनी कोण हे कसे कळावे? म्हणून पोलिस या परिसरातील कुणी बेपत्ता आहे का, याचा शोध घेतात. तो शोध त्यांना शेजारच्या मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर जिल्ह्यात घेऊन जातो. तेथील खकनार जिल्ह्यात एक महिला बेपत्ता झाल्याच्या तक्रारीची नोंद असते. ती मुलगी नेमकी मूळची जळगाव जामोद परिसरातील असते. पोलिस धागे जुळवतात आणि खुनाचा छडा लागल्याचे सांगतात. त्या बेपत्ता मुलीचे नाव असते शिवानी. विवाहित असली तरी सासरी न राहता, आपल्या मित्रासोबत ती फरार झालेली असते. त्याच्या रागातून शिवानीचे वडील आणि तिचा भाऊ डोक्यात बांबू घालून तिची हत्या करतात. तिचा मृतदेह एक दिवस घरातच ठेवतात, मग बाहेर नेऊन फेकून देतात. जाळतात अशी माहिती देत पोलिस शिवानीच्या वडिलांना व भावाला अटक करतात. तपासादरम्यान शिवानीच्या वडिलांनी आणि भावाने खुनाची कबुली दिल्याचेही पोलिस सांगतात.

शिवानीचे वडील आणि भाऊ तुरुंगात असताना हे प्रकरण एक नाट्यमय वळण घेते. बऱ्हाणपूरच्या खकनार पोलिसांत एक महिला येते आणि सांगते, की 'मी शिवानी, मी जिवंत आहे.' शिवानी बुलढाणा जिल्ह्यात येऊन पोलिसांना जिवंत असल्याची वर्दी देते. पोलिस हादरतात. ती बनावट तर नसेल ना? पोलिसांचा तपास भरकटविण्यासाठी तर आली नसेल ना, असे प्रश्न करीत पोलिस तिच्या बोटाचे ठसे घेतात. तिची ओळख पडताळतात. ती खरीच शिवानी असते. काहीच दिवसांपूर्वी एका मोठ्या हत्येचा छडा लावल्याचे श्रेय घेणारे पोलिस ओशाळतात. पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्हे उभी राहतात. पोलिसांवर कारवाई काय? बदली, निलंबन.

ही घटना काही प्रश्नांना जन्म देते. सापडलेला मृतदेह शिवानीचा आहे हे सांगण्याची घाई पोलिस का करतात? डीएनए चाचणीचा आधार का घेत नाहीत. शिवानी जर जिवंत आहे तर तिचे वडील आणि भाऊ 'होय आम्हीच शिवानीला मारले' अशी खोटी साक्ष का देतात? गुन्हा कबूल करून तुरुंग का पत्करतात. शिवानीचे काका सांगतात त्याप्रमाणे पोलिसांनी मारहाण करून तो गुन्हा कबूल करायला लावला, हे खरे असावे का? तो मृतदेह जर शिवानीचा नाही तर तो कुणाचा आहे? कुणी, कुणाला मारले असावे? कुणाला वाचविण्याचा प्रयत्न तर होत नसावा?

काही दिवसांपूर्वी खरात प्रकरणाचे उत्खनन होत असताना, 'परतवाडा फाइल्स' प्रकरण गाजले होते. त्यातील आरोपींच्या वाढदिवसाला असलेली पोलिसांची उपस्थिती वादग्रस्त ठरली. त्याही पोलिसांची बदली झाली. काही वर्षांपूर्वी विदर्भातच 'मथुरा' प्रकरण गाजले होते. त्या प्रकरणातील पोलिसांच्या भूमिकेवर संताप व्यक्त केला गेला. आंदोलने झाली. त्यातून कायद्यातील कलम बदलले गेले. आता तर कायदा बदलला. भारतीय न्याय संहिता आली, तरीही पोलिस का बदलत नसावेत?

खाकी हा केवळ रंग नाही. विश्वासाचे प्रतीक आहे. त्याच्या नैतिक दराऱ्याने अनेकांना चुकीचे काम करण्याची हिंमत होत नाही आणि ज्यांच्यासोबत चुकीचे झाले त्यांना हेच वाटत असते की खाकी आम्हाला न्याय देईल. अशा घटनांनी खाकीचा गडद रंग फिकट होऊ लागला तर वर्दीवरील स्टारकडे विश्वासाने बघणे थांबेल आणि आकाशातील ताऱ्यांकडे बघून 'तूच आमचा वाली' असे म्हणण्याची वेळ येईल. तसे होऊ नये इतकेच.

– अतुल पांडे

# स्वागतार्ह आदेश !



भारतीय प्रशासकीय सेवेतील धडाकेबाज अधिकारी तुकाराम मुंढे यांची अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदी नियुक्त झाली. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी सुप्त अवस्थेत असलेल्या नियमांची अतिशय कडक अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यांनी राज्यातील अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना रस्त्यावरील वडापाव विक्रेते, भाजी विक्रेते, हॉटेल्स आणि मिठाई दुकानदारावर छापे टाकून वृत्तपत्राचा वापर थांबवण्याचे आदेश दिले आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत थेट गुन्हे दाखल करणे किंवा मोठ्या रकमेचा दंड ठोकण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले आहेत.

मुंढे साहेबांच्या आदेशानंतर FSSI आणि मुंबई महानगरपालिकेने (BMC) संयुक्त मोहीम हाती घेत अशा विक्रेत्यांवर कडक कारवाई सुरू केली आहे. केवळ मुंबईतच नाही तर राज्यातील अनेक शहरात वृत्तपत्रात खाद्यपदार्थ विकणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई सुरू झाली आहे. अन्न व औषध प्रशासनाने वर्तमानपत्रात खाद्यपदार्थ विकणाऱ्या विक्रेत्यांवर सुरू केलेली ही धडाकेबाज कारवाई स्वागतार्ह आहे. या धडाकेबाज कारवाईचे जनतेतून स्वागतच होत असून या करवाईसाठी तुकाराम मुंढे साहेबांचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांचे जाहिर आभारही मानले जात आहे. ही कारवाई सुरू झाल्यानंतर अनेकांना असे वाटले की वर्तमानपत्राच्या कागदात खाद्यपदार्थ देऊ नये हा तुकाराम मुंढे साहेबांचा आदेश आहे प्रत्यक्षात त्यांनी आधीपासून असलेल्या कायद्याची प्रभावी आणि कडक अंमलबजावणी केली आहे. वर्तमानपत्रात खाद्यपदार्थ देण्यावर कायद्याने बंदी २०१९ पासूनच आहे मात्र त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नव्हती.

तुकाराम मुंढे साहेबांनी त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली ही कारवाई पुढे पण अशीच सुरू राहिली पाहिजे कारण खाद्यपदार्थ विक्रेते सर्रासपणे वर्तमानपत्राच्या कागदात भजे, वडापाव, पोहे, उपमा, इडली, डोसा, उडीदवडा, कच्छी दाबेली यासारखे गरम खाद्यपदार्थ बांधून देतात. भेळ विक्रेतेही वर्तमानपत्राच्या कागदातच भेळ बांधून देतात. पथारीवरील छोटे व्यावसायिकच नव्हे तर छोटे छोटे हॉटेल्स, बेकरी व्यावसायिक, स्नॅक सेंटर, स्वीट होम चालक, फेरीवाले खाद्यपदार्थ बांधण्यासाठी वर्तमानपत्राचा कागद सर्रासपणे वापरतात. टिश्यू पेपर किंवा किचन रोल्सच्या तुलनेत हा पर्याय स्वस्त असल्याने निवडला जातो मात्र ; असे करणे आरोग्यास हानिकारक आहे. वर्तमानपत्राचा किंवा मासिकाचा कागद अधिक आकर्षित करण्यासाठी डायआयब्युटाइल फटालेट आणि डायईन आयसोब्यूटाईल या केमिकलचा वापर वृत्तपत्र छपाईसाठी केला जातो.

हे केमिकल आरोग्यासाठी अतिशय घातक असल्याचे तज्ज्ञ सांगतात. याशिवाय वर्तमानपत्राच्या छपाईसाठी वापरल्या जाणाऱ्या शाईमध्ये शिसे, कॅडियम आणि झिंक यासारखे जड धातू असतात जेंव्हा गरम किंवा तेलकट पदार्थ ( कसे भजे, वडापाव, पोहे ) कागदावर ठेवले जातात तेंव्हा ती शाई वितळून अन्नात मिसळते. शाई मधील रासायनिक घटक पोटात गेल्यास पोटाचे विकार, यकृताचे आजार, किडनी निकामी होणे आणि दीर्घकाळात कॅन्सर सारखे गंभीर आजार होऊ शकतात. अमेरिकेतील शास्त्रज्ञांनी मध्यंतरी एक प्रयोग केला. या प्रयोगात त्यांनी वेष्टन म्हणून वापरल्या जाणाऱ्या कागदाचे पृथक्करण करण्याची पद्धत शोधून काढली.

यानंतर या शास्त्रज्ञांनी विविध हॉटेल्स, उपहारगृहे यात फास्टफूड बांधून दिल्या जाणाऱ्या वेष्टनाच्या कागदाचे तसेच पदार्थांचे विश्लेषण केले तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की ज्या वेष्टनाच्या कागदावर छपाई केली आहे अशा वर्तमानपत्राचा आणि मासिकाचा कागद वापरलेले खाद्यपदार्थ ज्यांनी सेवन केले आहे त्या लोकांच्या पोटात अनेक घातक घटक गेले आहेत हे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले. हे घातक घटक शरीरात गेल्यावर ते कोणत्या अवयवात जाऊन कोणत्या प्रकारचे दोष निर्माण करतात यावरही त्यांनी संशोधन केले तेंव्हा त्यांच्या असे लक्षात आले की घातक घटक (केमिकल) किडनी, यकृत, जठर आणि फुफ्फुसावर दुष्परिणाम करतात. ब्रेडला आवरण म्हणून वापरला जाणारा कागद हा याबाबतीत सर्वाधिक घातक दुष्परिणाम घडणारा असल्याचे शास्त्रज्ञांच्या लक्षात आले असून त्याचे प्रमाण ५६ टक्के आहे तर बर्गर, सँडविच बांधून दिलेल्या कागदात ३२ टक्के घातक घटक असल्याचे त्यांनी सिद्ध करून दाखवले. वर्तमानपत्राच्या कागदामध्ये देखील मोठ्या प्रमाणात घातक घटक असतात. हे घातक घटक पोटात गेल्याने अनेक गंभीर आजार होऊ शकतात म्हणूनच नागरिकांनी वर्तमानपत्रात बांधून दिलेले खाद्यपदार्थ खाणे टाळले पाहिजे. विक्रेत्यांनीही खाद्यपदार्थ वर्तमानपत्राच्या कागदात बांधून देण्याऐवजी टिश्यू पेपर किंवा किचन रोल्सचा वापर करावा. ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्न व औषध प्रशासन विभागाने दिलेला हा आदेश अतिशय योग्य असून त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी.


– श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# देव, दारिद्र्य आणि समाजव्यवस्था : भीक मागणारा माणूस मंदिराबाहेरच का दिसतो?

भारतीय समाजात धर्म, श्रद्धा आणि देवस्थाने यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. गावोगावी उभ्या असलेल्या मंदिरांच्या उंच शिखरांपासून ते महानगरांतील भव्य देवालयांपर्यंत भक्तीचा अखंड प्रवाह वाहताना दिसतो. लाखो-कोट्यवधी रुपयांच्या देणग्या, सोन्या-चांदीचे मुकुट, महाप्रसाद, उत्सव आणि यात्रांमधून श्रद्धेचे वैभव अनुभवायला मिळते. परंतु या वैभवाच्या सावलीत एक वेदनादायी वास्तव कायम उभे असते, मंदिराच्या पायरीवर बसलेला भिकारी, देवाच्या दर्शनासाठी आलेल्या भक्तांच्या रांगा आणि त्याच देवाच्या दारात उपाशीपोटी मदतीची याचना करणारा माणूस यांच्यातील विरोधाभास समाजाच्या अंतरंगावर अनेक प्रश्नचिन्हे निर्माण करतो. आज भारत जगातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक मानला जातो. अवकाश संशोधन, तंत्रज्ञान, उद्योग आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात देशाने मोठी झेप घेतली आहे. पण या विकासाच्या झगमगाटामागे अजूनही लाखो लोक दारिद्र्य, उपासमार आणि बेरोजगारीशी झुंज देत आहेत. मंदिरांच्या गाभाऱ्यांमध्ये सुवर्णमंडित देवता दिसतात, पण मंदिराबाहेरच्या रस्त्यावर अन्नासाठी हात पसरलेली माणसेही दिसतात. ही केवळ आर्थिक विषमता नाही, ही सामाजिक संवेदनशीलतेची परीक्षा आहे.

धर्म माणसाला नैतिकता, करुणा आणि परोपकाराची शिकवण देतो. प्रत्येक धर्म मानवसेवेला सर्वोच्च स्थान देतो. मग देवाचे दर्शन घेऊन बाहेर पडणारा भक्त मंदिराच्या पायरीवर बसलेल्या वृद्धाकडे, अपंगाकडे किंवा उपाशी मुलाकडे दुर्लक्ष का करतो? देवाला लाखो रुपयांचे दान देताना समाज उदार असतो, पण एखाद्या गरिबाच्या शिक्षणासाठी, उपचारासाठी किंवा पुनर्वसनासाठी त्याच उदारतेने पुढे येतो का? हा प्रश्न धर्माचा नाही, तो मानवी संवेदनांचा आहे. भारतातील अनेक प्रसिद्ध देवस्थानांकडे प्रचंड आर्थिक संसाधने आहेत. भक्तांच्या श्रद्धेतून निर्माण झालेली ही संपत्ती नक्कीच पवित्र आहे. परंतु त्या संपत्तीचा काही भाग समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी, शिक्षणासाठी, आरोग्यासाठी आणि रोजगारनिर्मितीसाठी अधिक व्यापकपणे वापरला गेला, तर त्यातून श्रद्धेचे सामाजिक सामर्थ्य अधिक प्रभावीपणे दिसून येईल. कारण देवाला अर्पण केलेली संपत्ती शेवटी माणसाच्या कल्याणासाठीच उपयोगी पडली, तरच तिचे खरे सार्थक होईल. दारिद्र्य हा कोणत्याही व्यक्तीचा अपराध नसतो. तो अनेकदा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विषमतेचा परिणाम असतो. शिक्षणाचा अभाव, रोजगाराच्या मर्यादित संधी, ग्रामीण भागातील असमान विकास, अपुरी सामाजिक सुरक्षा आणि वाढती महागाई यांमुळे अनेकांना जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो. अशा परिस्थितीत भीक मागणारा माणूस हा केवळ एक व्यक्ती नसतो; तो समाजव्यवस्थेच्या अपयशाचा जिवंत पुरावा असतो.

समाजसुधारकांनी आणि विचारवंतांनी याच प्रश्नांवर सातत्याने भाष्य केले आहे. महात्मा फुले यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन मानले. राजर्षी शाहू महाराजांनी वंचितांना संधी देण्याचा मार्ग दाखविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण, संघटन आणि संघर्षाचा मंत्र दिला. त्यांनी माणसाच्या स्वाभिमानाला सर्वोच्च स्थान दिले. त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू हा माणूस होता. समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळाल्याशिवाय प्रगती पूर्ण होऊ शकत नाही, हा त्यांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा




आहे. श्रद्धा ही माणसाच्या आयुष्याचा आधार असते. संकटात सापडलेल्या अनेकांना मंदिर, मशिद, गुरुद्वारा किंवा चर्च यांमधून मानसिक बळ मिळते. त्यामुळे धर्म किंवा श्रद्धेवर टीका करणे हा या चर्चेचा उद्देश नाही. उलट श्रद्धा आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर संगम घडविणे हा हेतू आहे. मंदिरातील घंटानादाबरोबरच समाजातील उपाशी पोटांचा आवाजही ऐकू येणे आवश्यक आहे. भक्ती आणि मानवता यांच्यातील दुवा अधिक मजबूत झाला पाहिजे.

आज दानधर्माच्या संकल्पनेलाही नव्याने समजून घेण्याची गरज आहे. भिकाऱ्याच्या हातावर काही नाणी ठेवणे ही तात्पुरती मदत असू शकते, पण त्याला शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे ही कायमस्वरूपी मदत ठरते. एखाद्या विद्यार्थ्याची फी भरणे, एखाद्या रुग्णाच्या उपचारासाठी मदत करणे, एखाद्या कुटुंबाला स्वावलंबी बनविणे किंवा एखाद्या युवकाला रोजगार उपलब्ध करून देणे हीच खरी समाजसेवा आहे. अशा कृतींमध्ये धर्माचा आत्मा अधिक जिवंत दिसतो. भारतीय संतपरंपरेनेही हाच संदेश दिला आहे. संत तुकारामांनी दया आणि करुणेला महत्त्व दिले. संत कबीरांनी बाह्य आडंबरांपेक्षा अंतःकरणाच्या शुद्धतेवर भर दिला. संत गाडगेबाबांनी स्वच्छता, शिक्षण आणि मानवसेवा यांनाच खरी पूजा मानले. त्यांनी मंदिरांपेक्षा समाजातील दुःख दूर करण्याला अधिक महत्त्व दिले. आजच्या काळात त्यांच्या विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. समाज म्हणून आपण अनेकदा धार्मिकतेचे प्रदर्शन करतो, परंतु मानवतेची खरी परीक्षा आली की मागे पडतो. उत्सवांमध्ये लाखो रुपये खर्च होतात, पण शेजारी राहणाऱ्या गरजू कुटुंबाच्या अडचणींकडे दुर्लक्ष केले जाते. भव्य मिरवणुका काढल्या जातात, पण रस्त्यावर पडलेल्या जखमी व्यक्तीला मदत करण्यासाठी अनेकजण थांबत नाहीत. धर्माचा खरा अर्थ जर करुणा, दया आणि सेवा असेल, तर या मूल्यांचे प्रतिबिंब आपल्या कृतीत दिसणे आवश्यक आहे.

मंदिराबाहेर बसलेला भिकारी हा समाजाला प्रश्न विचारतो तुमच्या विकासात माझे स्थान कुठे आहे? तुमच्या श्रद्धेने माझ्या जीवनात काय बदल घडवला? माझ्या मुलालाही शिक्षण, रोजगार आणि सन्मानाचे जीवन मिळणार आहे का? या प्रश्नांची उत्तरे केवळ भाषणांमध्ये किंवा तत्त्वज्ञानात नाहीत, ती आपल्या सामाजिक धोरणांमध्ये, प्रशासनाच्या कार्यक्षमतेत आणि नागरिकांच्या संवेदनशीलतेत दडलेली आहेत. आज देशाला अधिक भव्य मंदिरांइतकीच गरज अधिक सक्षम माणसे घडविण्याची आहे. अधिक सोन्याचे कळस उभारण्याबरोबरच अधिक शाळा, वसतिगृहे, रुग्णालये, कौशल्य विकास केंद्रे आणि रोजगारनिर्मितीची साधने उभी राहिली पाहिजेत. श्रद्धा आणि विज्ञान, धर्म आणि सामाजिक न्याय, पूजा आणि सेवा यांचा समतोल साधला गेला तरच विकासाला खरे मानवी रूप प्राप्त होईल. विकासाचे मोजमाप केवळ जीडीपी, महामार्ग किंवा उंच इमारतींनी होत नाही. समाजातील सर्वात दुर्बल व्यक्ती किती सन्मानाने जगते, यावरच कोणत्याही राष्ट्राची खरी प्रगती अवलंबून असते.

मंदिराबाहेर भीक मागणारा माणूस दिसत असेपर्यंत समाजाच्या प्रगतीचे दावे अपूर्णच राहतील. कोणत्याही सभ्य समाजाची महानता त्याच्या मंदिरांच्या उंचीने किंवा संपत्तीने ठरत नाही; ती समाजातील सर्वात दुर्बल व्यक्तीच्या जीवनातील सन्मानाने ठरते. देवावर श्रद्धा ठेवणे हा प्रत्येकाचा वैयक्तिक अधिकार आहे; पण माणसावर प्रेम करणे आणि त्याच्या सन्मानासाठी उभे राहणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे. शेवटी प्रश्न देवाचा नाही, तर माणुसकीचा आहे. मंदिरातील देवापर्यंत पोहोचण्यापूर्वी मंदिराबाहेर बसलेल्या माणसापर्यंत आपण पोहोचलो, तरच समाज अधिक न्याय्य, संवेदनशील आणि समतामूलक बनेल. त्या दिवशी मंदिराच्या पायरीवरची भीक कमी होईल आणि मानवतेची श्रीमंती अधिक वाढेल. हाच खऱ्या अर्थाने धर्माचा विजय आणि समाजव्यवस्थेच्या यशाचा मापदंड ठरेल. मंदिरातील देवापर्यंत पोहोचण्याची घाई आपण नेहमीच करतो, पण मंदिराबाहेर बसलेल्या माणसापर्यंत पोहोचण्याची संवेदना किती जपतो, हा खरा प्रश्न आहे. कारण धर्माचे अंतिम ध्येय देवापर्यंत पोहोचणे नसून माणुसकीपर्यंत पोहोचणे हेच असते. मंदिराच्या पायरीवरची भीक संपली आणि प्रत्येक हाताला काम, प्रत्येक पोटाला अन्न व प्रत्येक व्यक्तीला सन्मान मिळाला, तर तोच समाजव्यवस्थेचा खरा विजय आणि श्रद्धेचा सर्वोच्च उत्सव ठरेल.

– प्रवीण बागडे
नागपूर, ९९२३६२०९१९

## घोडेबाजार

राज कारणी कायम
तेजीत घोडा बाजार
गाढवी वृत्ती भारली
समस्त पक्ष रे बेजार

भल्या समाजमनांस
जडे असाध्यआजार
विकत घ्यायचीनिष्ठा
वापरेधनाढ्यऔजार

सगळेलावले पणास
मनावर वागवेजंजार
बदलतात समिकरणे
ढिल्लीकरती विजार

सरळनसे निवडणूक
यंत्रणेचा येई जौजार
कुजक्या व्यवस्थेशी
लढतराहतात झुंजार

विजय प्राप्ती करता
पर्याय असती हजार
सोयरे सुतक कसले
कुणीही चाले शेजार

पक्ष पर्यटन करतात
इकडेतिकडे येरझार
देवा पेक्षा मोठा वाटे
प्रवेश देणारा पुजार

– हेमंत मुसरीफ, पुणे.
९७३०३०६९९६

अक्षराज अचूक वृत्त, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# पावसाळ्यापूर्वी आपत्कालीन तयारीचा अभाव प्रभाग ७ मधील कचरा व डेब्रिजमुळे नागरिकांमध्ये चिंता

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०७, माथेरान :** माथेरानमध्ये पावसाळा तोंडावर आला असतानाही नगरपालिका प्रशासनाकडून आपत्कालीन व्यवस्थापनाबाबत अपेक्षित तयारी होताना दिसत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस पडणाऱ्या माथेरानमध्ये संभाव्य आपत्तींचा सामना करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

माथेरान हे देशातील प्रसिद्ध थंड हवेचे पर्यटनस्थळ असून येथे दरवर्षी सुमारे २५० ते ३०० इंच पर्जन्यवृष्टीची नोंद होते. अतिवृष्टीमुळे दरडी कोसळणे, झाडे पडणे, गटारे तुंबणे तसेच पावसाचे पाणी रस्त्यांवर साचणे अशा समस्या वारंवार निर्माण होतात. मात्र यावर्षी ही अनेक भागातील गटारे व पावसाळी नाले साफ करण्यात आले नसल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेषतः रेल्वे स्थानकाजवळील प्रभाग क्रमांक ७ मधील नगरपालिका चाळीच्या मागील बाजूस गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात कचरा, मातीचा भराव आणि डेब्रिज साचले आहे. या ठिकाणी ओला व सुका कचरा तसेच बांधकामातील अवशेष मोठ्या प्रमाणावर जमा झाल्याने



अनधिकृत डंपिंग ग्राऊंडच निर्माण झाल्याची परिस्थिती आहे.

परिसरात अनेक घरगुती लॉजिंग व्यवसाय सुरू असल्याने पर्यटकांची सतत वर्दळ असते. अशा परिस्थितीत पावसाळ्यात हा साचलेला कचरा व डेब्रिज पावसाच्या पाण्यासोबत वाहून रस्त्यावर येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिकांच्या मते, अतिवृष्टी झाल्यास हा कचरा गटारांमध्ये जाऊन पाण्याचा निचरा अडवू शकतो. परिणामी रस्त्यांवर पाणी साचण्याबरोबरच काही घरांमध्येही पावसाचे पाणी शिरण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.दरम्यान, या ठिकाणी जांभ्या दगडाची संरक्षक भिंत उभारणे किंवा उंच पत्र्याचे शेड उभारून कचरा व मातीचा भराव स्थिर ठेवण्याचा पर्याय सुचविण्यात आला आहे.

यासंदर्भात नगरसेविका अनिता गणपत रांजाणे यांनी २९ मे रोजी मुख्याधिकारी आणि नगराध्यक्ष यांना लेखी निवेदन सादर केले असल्याची माहिती दिली. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.याबाबत बोलताना नगरसेविका अनिता रांजाणे म्हणाल्या की, प्रभाग ७ मधील साचलेला कचरा आणि डेब्रिज पावसाळ्यात नागरिकांसाठी मोठी समस्या निर्माण करू शकतो. प्रशासनाने वेळेत उपाययोजना न केल्यास त्याचे गंभीर परिणाम स्थानिकांना भोगावे लागू शकतात. आम्ही वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना प्रशासनाने तातडीने पाहणी करून आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# मांजरांसाठी टाकलेल्या मांसामुळे परिसरात दुर्गंधी; प्रशासनाकडे कारवाईची मागणी

## पाळीव मांजरांचा वाढता उपद्रव; दुर्गंधी, झोपमोड आणि मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०७, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी खुर्द परिसरातील एका कुटुंबाने मोठ्या प्रमाणावर पाळलेल्या मांजरांमुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाल्याची तक्रार स्थानिकांकडून करण्यात येत आहे. मांजरांना खाद्य म्हणून कोंबडीचे पाय, मुंडकी तसेच इतर मांसजन्य पदार्थ दिले जात असल्याने स्वच्छता व आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



स्थानिकांच्या माहितीनुसार, मांजरांना टाकण्यात आलेले खाद्यपदार्थ मांजरे उचलून शेजारील घरांच्या परिसरात, अंगणात किंवा घरांच्या आडोशाला घेऊन जातात. त्यानंतर उरलेले अन्न तसेच पडून राहत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरते. यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून आरोग्याच्या दृष्टीनेही धोका निर्माण होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. याबाबत यापूर्वीही प्रसारमाध्यमांमधून बातम्या प्रसिद्ध झाल्या असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तसेच ग्रामपंचायत प्रशासनाकडे तक्रारी करूनही अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. परिसरातील रहिवाशांनी संबंधित कुटुंबाला समजावून सांगण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले जात असले, तरी त्यातून अनेकदा वाद निर्माण होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. तसेच मांजरांना मांसजन्य पदार्थ पुरविणाऱ्या व्यक्तीची ही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

विशेष म्हणजे संबंधित परिसरासमोर गणपती मंदिर असून स्वच्छता व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे. दरम्यान, रात्रीच्या वेळी ही मांजरे घरांच्या छतांवर व परिसरात वावरत असल्याने नागरिकांची झोपमोड होत असल्याचेही सांगितले जात आहे. लहान मुले दचकून जागी होतात तसेच परिसरात दुर्गंधी पसरल्यामुळे नागरिकांना नाकावर रुमाल धरून ये-जा करावी लागत असल्याची प्रतिक्रिया काही रहिवाशांनी व्यक्त केली.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, परिसरातील लहान मुलांच्या सुरक्षिततेचा ही प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित मांजरे अनेकदा लहान मुलांच्या अंगावर धावून जातात. काही प्रसंगी मांजरांनी मुलांना चावा घेतल्याच्याही घटना घडल्याचा दावा नागरिकांनी केला आहे. त्यामुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, मुलांना घराबाहेर खेळण्यासाठी पाठविताना विशेष काळजी घ्यावी लागत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

या सर्व बाबींचा विचार करून ग्रामपंचायत प्रशासन, आरोग्य विभाग तसेच संबंधित यंत्रणांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी, तसेच नागरिकांना होणारा त्रास कायमस्वरूपी दूर करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# चंद्रपूरच्या 'वाघ्या हळदी' ला जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी प्रयत्न

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** लभान सराड फॅार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, खांबाडा(ता. वरोरा) यांच्या पुढाकाराने आयोजित हळद उत्पादक शेतकरी संवाद मेळाव्यास जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी विशेष उपस्थिती दर्शवून शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला.

मेळाव्यात बोलतांना जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील पारंपारिक हळदीची वैशिष्ट्ये अधोरेखित केली. इतर हळदीच्या तुलनेत येथील हळदीमध्ये आढळणारे ७.५ ते ८ टक्के उच्च दर्जाचे कर्क्युमिन, उत्कृष्ट गुणवत्ता आणि जागतिक बाजारपेठेतील मोठी संभाव्यता यामुळे या हळदीला स्वतंत्र ओळख मिळू शकते. याच अनुषंगाने चंद्रपूरच्या हळदीस भौगोलिक मानांकन मिळवून देण्यासाठी



आवश्यक प्रक्रिया, कागदपत्रे, संशोधन, नमुना संकलन आणि संस्थात्मक प्रयत्न करण्यात येईल. जिल्ह्यातील हळदीला ' वाघ्या हळद' या नावाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र ओळख मिळवून देण्यासाठी प्रशासन सकारात्मक पावले उचलणार असल्याचे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. यावेळी हळद लागवड, पेरणी व्यवस्थापन, उत्पादन प्रक्रिया, विपणन तसेच विक्रीसंदर्भातील विविध समस्या व संधी यांवर शेतकऱ्यांच्या बांधावर सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांच्या निराकरणासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शेतकऱ्यांशी थेट संवाद, त्यांच्या समस्यांचे प्रत्यक्ष आकलन आणि स्थानिक उत्पादनाला जागतिक ओळख मिळवून देण्याच्या दृष्टीने हा मेळावा महत्वपूर्ण ठरला. ' स्थानिक वाघ्या हळदीपासून जागतिक बाजारपेठेपर्यंत' हा संकल्प साकार करण्यासाठी प्रशासन, एफपीसी, आणि शेतकरी यांचे सुक्तप्रयत्न पुढेही सुरु राहणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमाला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, नाबार्डचे महाव्यवस्थापक तृणाल फुलझेले, तहसीलदार योगेश कौटकर, प्रकल्प संचालक कुसळकर यांच्यासह विविध संस्थांचे प्रतिनिधी, लभान सराड एफपीसीचे संचालक मंडळ, सदस्य तसेच तालुक्यातील मोठ्या संख्येने हळद उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी 'अन्नत्याग': १२ जूनपासून रोहित पवार यांचे बेमुदत आंदोलन

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०७, पंढरपूर :** राज्यातील शेतकरी बांधवांच्या विविध प्रलंबित मागण्या, सरसकट कर्जमाफी तसेच शेतीसंबंधित प्रश्नांबाबत पक्षाचे फ्रंटल सेल प्रमुख व आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली येत्या १२ जूनपासून पंढरपूर शहरात बेमुदत अन्नत्याग आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

या आंदोलनासाठी पंढरपूर शहरातील छत्रपती शिवाजी चौक येथील मैदान उपलब्ध करून देण्यात यावे, याबाबत आज पंढरपूर शहर पोलीस स्टेशनमध्ये अधिकृत निवेदन सादर करण्यात आले. लोकशाही मार्गाने आणि शांततापूर्ण पद्धतीने आंदोलन पार पाडण्यासाठी आवश्यक परवानग्या व सहकार्य मिळावे



अशी विनंतीही यावेळी करण्यात आली.

**'शेतकरी न्याय'साठी आंदोलन**

सरसकट कर्जमाफी, शेतमालाला हमीभाव, पीक विमा, वीज प्रश्न यासह शेतीसंबंधित विविध प्रलंबित मागण्यांसाठी हे आंदोलन छेडण्यात येणार आहे. आमदार रोहित पवार स्वतः या बेमुदत अन्नत्याग आंदोलनात सहभागी होणार असल्याने आंदोलनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी लोकशाही मार्गाने हे आंदोलन होणार आहे. शासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे लक्ष द्यावे, अशी भूमिका यावेळी पदाधिकाऱ्यांनी मांडली.

याप्रसंगी पक्षाचे उद्योग व्यापार सेलचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे, शहराध्यक्ष दीपक वाडदेकर, डॉ. योगेश रणदिवे, शिक्षक सेल प्रदेश सचिव संजय शिंदे, जिल्हाध्यक्ष अमरसिंह खांडेकर, उपाध्यक्ष पांडुरंग सोलंकर, तालुकाध्यक्ष संतोष पवार, डॉ. सूर्यकांत बागल, युवराज भोसले, साहेबराव भुसे, ओंकार जगताप, समाधान जाधव, मोहम्मद मुलानी तसेच इतर पदाधिकारी, सहकारी उपस्थित होते.

## थोडक्यात

# गोर्लेगाव शिवारामध्ये वादळी वाऱ्यामुळे शेतातील सोलार चे प्रचंड नुकसान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, हदगाव (नांदेड) :** हदगाव तालुक्यातील मौजे गोर्लेगाव येथे दिनांक ०५ जून २०२६ रोजी झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालेले आहे. यामध्ये काही शेतातील शेतकऱ्यांच्या जनावरांच्या गोठ्यावरील पत्र सुद्धा उडून गेलेले आहेत.



शनिवार, दिनांक ०५ जून २०२६ रोजी सायंकाळी सुटलेल्या सुसाट्याच्या वाऱ्याने व वादळी पावसाने गोर्लेगाव येथील रहिवाशी असणारे शेतकरी मंजुळाबाई शेषराव सूर्यवंशी यांच्या गोर्लेगाव येथील शेत सर्वे क्रमांक ७७/२/अ/२ मध्ये बसवण्यात आलेल्या जीके एनर्जी या सोलार कंपनीचे सोलार पॅनल सुसाट्याच्या वाऱ्यामध्ये उडून गेल्याने त्यांची ४ सोलर पॅनल फुटून मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी सोलार कंपनीकडून सोलर पॅनल बदलून मिळावे ही मागणी केलेली आहे.

# पर्यावरण दिनानिमित्त चिमुकल्यांनी रोवले पर्यावरण संरक्षणाचे बीज




**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.०७, चिमुर (चंद्रपूर) :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गोंदेडा येथील तपोभूमी साधनाश्रम परिसरात ग्रामसभा गोंदेडा यांच्या सौजन्याने बीजारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे हा संदेश देत गावकरी, महिला, युवक आणि चिमुकल्यांनी पर्यावरण संवर्धनाची शपथ घेत बीजारोपण केले. या उपक्रमात मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी सहभाग नोंदवून पर्यावरणाबाबतची आपली बांधिलकी व्यक्त केली. विशेष म्हणजे लहान मुलांनीही उत्साहाने सहभाग घेत वडीलधाऱ्यांकडून निसर्ग संवर्धनाचे धडे आत्मसात केले. नवीन पिढीला पर्यावरणाचे महत्त्व पटवून देत बालकांच्या हस्ते बीजारोपण व वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरणाचे जतन व संवर्धन ही काळाची गरज असल्याचे सांगितले. आज लावलेले हे बीज भविष्यात हिरवाईचे रूप धारण करून पुढील पिढ्यांना शुद्ध व आरोग्यदायी पर्यावरण देण्यास हातभार लावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. सदर उपक्रम सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समितीच्या कोषाध्यक्ष अनुसया मानकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार कार्यक्रमाच्या पडला. यशस्वीतेसाठी आशिष दोडके, प्रभूधारणे, सुमित धारणे, प्रतिभा धारणे व पुष्पा वाढई यांनी विशेष सहकार्य केले. प्रा.निळकंठ लोनबले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

# चंद्रपुरात दुचाकीवरुन आणला सुगंधित तंबाखू, महिला ताब्यात




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** गुटखा स्मग्लिंग विरोधात चंद्रपूर जिल्हा पोलिस आणि अन्न व औषध प्रशासनाने कठोर मोहीम सुरु ठेवली आहे. दुर्गापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी दुचाकीवरुन प्रतिबंधित गुटखा, पान मसाला आणि सुगंधित तंबाखूची वाहतूक करणाऱ्या आरोपींलर कारवाई केली. या कारवाईत ४१ हजार रुपयांहून अधिक किंमतीचा साठा जप्त करण्यात आला असून, एका महिला आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. या घटनेमुळे जिल्ह्यातील तंबाखू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या सहकार्याने पोलीस अशा समाजकंटकावर सातत्याने धाडी टाकत असून, यापुर्वी अशाच एका मोठ्या गुन्हेगारी टोळीवर थेट ' मिनी मकोका' अंतर्गत कठोर कारवाई करण्यात आली आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून दुर्गापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका दुचाकीवरुन प्रतिबंधित अन्नपदार्थाची वाहतूक करणाऱ्या तस्करांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**दुर्गापूर परिसरात सापळा रचून कारवाई :** मिळालेल्या माहितीनुसार, ४ जून २०२६ रोजी रात्री १० वाजताचा सुमारास तुकुम तुर्गापूर रोडवरील पुलीया नेरी वार्ड परिसरात पोलीस उपनिरीक्षक नरेश उरकुडे व त्यांच्या पथकाने अन्न सुरक्षा अधिकारी कुणाल गो. मुळे यांच्यासह सापळा रचला होता. यावेळी होन्डै ॲक्टिवा दुचाकीवरुन ( एमएच ३४- सीपी ३८८४) प्रतिबंधित साठा घेऊन जात असताना पोलिसांनी त्याला थांबवले. पोलिसांना पाहताच दुचाकी चालक रुद्राक्ष किशोर बुरांडे (रा. तुकुम) हा घटनास्थळावरुन पळून गेला, तर त्याच्यासोबत असलेली महिला आरोपी रक्षा किशोर ठक्कर (वय ५०, रा. ऊर्जानगर) हिला पोलिसांनी ताब्यात घेतले.

पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता, त्यामध्ये मानवी आरोग्याला घातक असलेला आणि कर्करोगाला निमंत्रण देणारा एकूण ४१, २७६ रुपयांचा सुगंधित तंबाखू व पान मसाल्याचा साठा जप्त करण्यात आला. यात २६ किलो वजनाचा होला हुक्का शिशा सुगंधित तंबाखू, विमल पान मसाला, विही. वन तंबाखू, आणि सिग्रेचर पान मसाला यांचा समावेश होता. चौकशीत हा माल इंदिरानगर येथील मुख्य पुरवठादार सचिन दमकोंडावार यांच्याकडून खरेदी केल्याचे समोर आले असून तो सध्या फरार आहे.

या प्रकरणी ५ जून २०२६ रोजी दुर्गापूर पोलीस ठाण्यात अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ सह भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम १२३, २२३, २७४, २७५ आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ठाणे प्रभारी संतोष शेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरु असून, पोलीस प्रशासनाने तंबाखू माफियांचे कंबरडे मोडण्याचा इशारा दिला आहे.